RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक १९] बुधवार, मार्च ११, २०२६/फाल्गुन २०, शके १९४७ [पृष्ठ १, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सामान्य प्रशासन विभाग

**अधिसूचना**

क्रमांक डीआयपी-२०२५/प्र.क्र.५४/राशि-१.— **महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, राज्याचे उप मुख्यमंत्री तसेच वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांचे बुधवार, दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी** बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. राज्य मंत्रिपरिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित करून श्रद्धांजली अर्पण केली. उप मुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन हे महाराष्ट्रासाठी कधीही भरुन न येणारे नुकसान आहे.

जमिनीशी घट्ट नाळ जुळलेले, राज्याच्या कानाकोपऱ्याची अचूक माहिती असलेले आणि प्रशासन व संसदीय कार्यपद्धीवर प्रभुत्व असलेले अजितदादा पवार हे परखड, स्पष्टवक्ते व निर्णयक्षम लोकनेते होते. सामान्य माणसांविषयी असलेली त्यांची आस्था, कठोर परिश्रम, वेळेचे काटेकोर पालन आणि वित्तीय शिस्त यामुळे त्यांनी राज्याची आर्थिक घडी सावरण्यासाठी अनेक कठोर पण आवश्यक निर्णय घेतले. पायाभूत विकास प्रकल्पांना चालना देण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले.

अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या अजितदादांनी शिक्षण, क्रीडा आणि सहकार क्षेत्रात भरीव कामगिरी केली. बारामती विद्या प्रतिष्ठान, रयत शिक्षण संस्था, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांसह विविध संस्थांद्वारे त्यांनी शिक्षण क्षेत्र बळकट केले. त्यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, राज्य खो-खो असोशिएशन आदि क्रीडा संघटनांचे अध्यक्षपद भूषविले. राज्यात क्रीडा संस्कृती रुजवली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महानंदा, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ आदी संस्थांवर संचालक, अध्यक्ष अशा विविध पदांवर दीर्घकाळ कार्य केले. या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्र अधिक मजबूत केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, एक वेळा लोकसभा सदस्य, आठ वेळा आमदार, सहा वेळा उप मुख्यमंत्री, विरोधीपक्षनेते, मंत्री, राज्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावली.

दूरदृष्टी, अनुभव आणि जनतेशी नातं जपणारे हे नेतृत्व सदैव स्मरणात राहील. महाराष्ट्राच्या समाजकारण आणि राजकारणावर आपल्या कार्यशैलीची अमीट छाप उमटवणाऱ्या या अमोघ नेतृत्वाची यापुढे उणीव भासत राहील. ज्येष्ठ नेते, राज्याचे उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांच्या निधनाबाबत राज्य मंत्रिमंडळ तीव्र शोक व्यक्त करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश अग्रवाल,**
मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.